कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय
दूरध्वनी क्रं. : (०२३१) २६५१४५७
फॅक्स नं. : (०२३१) २६५४९१९
Email – kolhapur.ee@mahapwd.com
वेबसाईट : www.mahapwd.com

जा.क्र.प्रशा/रस्ते-१/ 4237 /२०२१

दिनांक :- 29 JUN 2021

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर.

**विषय :-** अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ ची अंमलबजावणी
मौजे घोसरवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील वन गट क्र.१२ व ११९८ मधील कच्च्या रस्त्याचे पक्क्या रस्त्यामध्ये रूपातरीत करण्यात येणार आहे याप्रस्तावित वन जमिनीवर वन हक्क दावे नसलेबाबत नाहकरत प्रमाणपत्र मिळणेबाबत..

**संदर्भ :-** १. उपअभियंता, सा. बां . उपविभाग, शिरोळ यांचे पत्र जा.क्र. जय / रेशा / १०२८ / २०२० दि.२८/१०/२०२

उप अभियंता वर्ग-१, सा. उपविभाग शिरोळ ...
| | |
|---|---|
| अभियंता | |
| लिपीक | |
| पत्रव्यवहार | |
| नोंद क्र. | २०५ |

३/६/२१

उपरोक्त विषयास अनुसरून मौजे घोसरवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील वन गट क्र.१२ व ११९८ मध्ये सद्यस्थितीत कच्चा रस्ता आहे. त्यारस्त्याचे पक्क्या रस्त्यात रूपातरीत करून अपग्रेडेशन करण्यात येणार आहे. यासाठी एकूण ०.६८८५ हेक्टर वन क्षेत्र लागणार आहे. प्रस्तुत वन जमिन मागणेसाठी सा.बां.विभागामार्फत वन (संवर्धन) अधिनियमन १९८० अंतर्गत विहित प्रपत्रात प्रस्ताव तयार करून वन विभागाची व केंद्र शासनाची परवानगी घेण्यात येणार आहे. त्यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ ची अंमलबजावणीबाबत या अधिनियमाखाली प्रकल्पाधिन वन जमिनीवर कलम ३ खालील दावे, हक्क व न्यायालयीन प्रकरणी नसल्याबाबत उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांचेकडून नाहरकत दाखला घेणेत येत आहे.

सदर दाखल्यासाठी ग्रामपंचायत, घोसरवाड यांचे नाहरकत प्रमाणपत्र, ठराव, ग्रामसभेत उपस्थितीत असलेल्या ग्रामस्थांनी यादी यासोबत आपणाकडे सादर करण्यात येत आहे.

मौजे घोसरवाड, ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील वनगट क्र.१२ व १९९८ मध्ये करण्यात येणाऱ्या पक्क्या रस्त्यामुळे सदरचे गाव व आसपासच्या गावातील शेतकरी ग्रामस्थ व इतर लाकांना सार्वजनिक फायदा होणार आहे. तसेच पर्यटक व भाविक लोकांनाही येथील धार्मिक स्थळांना भेटी देतानाही फायदा होणार आहे. तरी आपले कार्यालयाकडून पार्ट - II मधील प्रमाणपत्र मिळणे विषयी विनंती आहे.

स्थळ प्रतीवर कार्यकारी अभियंता यांची सही असे

कार्यकारी अभियंता (करीता)
सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर.

प्रत :- उपअभियंता, सा. बां . उपविभाग, शिरोळ यांना माहितीसाठी रवाना.